**महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषदा यांच्या क्षेत्रामध्ये होर्डिंग, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स लावण्यासाठी जागा निश्चित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः याचिका-३०१७/प्र.क्र.१३०/नवि-२२**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख : १४ नोव्हेंबर, २०२२

**संदर्भ :-**

१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः याचिका-३०१७/प्र.क्र.१३०/नवि-२२, दि.१४.३.२०१७
२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः याचिका-२०२०/प्र.क्र.२१४/नवि-२२, दि.२९.४.२०२२
३) नगर विकास विभाग, शासन अधिसूचना क्रमांकः पीएमसी-३०१०/प्र.क्र.३९४/नवी-२२, दि.९.५.२०२२
४) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या दि.१२.१०.२०२२ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

राज्यातील अनधिकृत जाहिराती/होर्डिंग यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, जिल्हाधिकारी यांच्या क्षेत्रातील आकाश-चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी व्यापक स्वरूपाचे आदेश मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.१५५/२०११ या प्रकरणी दि.३१.०१.२०१७ रोजी दिलेले आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी संदर्भ क्र.१ येथील दि.१४.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेकरीता जाहिरात मार्गदर्शक तत्वे व संदर्भ क्र.३ येथील अधिसुचनेन्वये बृहन्मुंबई वगळून राज्यातील महानगरपालिकांकरीता जाहिरात नियत तयार करण्यात आले आहे. मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१५५/२०११ व इतर याचिकांच्या अनुषंगाने सुनावणी सुरु असुन मा.न्यायालयाने सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती यांना त्यांच्या क्षेत्रामध्ये होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स लावण्यासाठी जागा निश्चित करण्याबाबत, जाहिराती/होर्डिंग्स इत्यादीबाबत दररोज दिल्या जाणाऱ्या परवानग्यांची माहिती संबंधित पोलिसांना उपलब्ध करून देण्याबाबत व प्रत्येक बॅनर /होर्डिंग इत्यादींवर अर्जदाराचे नाव, परवानगी क्रमांक, परवानगी दिलेले ठिकाण, परवानगीचा कालावधी इ. माहिती असणारा QR कोड लावण्याबाबत सूचित केले आहे. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या दि.१२.१०.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत यानुषंगाने चर्चा करण्यात आली व याबाबतचे आदेश नगर विकास विभागाने द्यावेत असा निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय:-**

राज्यातील अनधिकृत जाहिराती/होर्डिंग यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून बृहन्मुंबई महानगरपालिकेकरीता जाहिरात मार्गदर्शक तत्वे व उर्वरित महानगरपालिकांकरीता जाहिरात नियत बनविण्यात आले आहे. त्यांमध्ये तात्पुरत्या जाहिरातींना परवानगीची व सदर तात्पुरत्या जाहिराती महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा यांच्या क्षेत्रामध्ये त्यांनी निश्चित केलेल्या जागी लावण्यात याव्यात अशी तरतुद आहे. तथापि, तात्पुरत्या जाहिराती (होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इत्यादी) लावण्यासाठी जागा

निश्चित करण्याबाबत नमूद केलेले नाही. त्यामुळे प्रत्येक नागरी स्थानिक संस्थांनी त्यांच्य क्षेत्रामध्ये होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इत्यादी तात्पुरत्या जाहिराती लावण्यासाठी जागा निश्चित करण्याचे व त्यास व्यापक प्रसिद्धी देण्याचे आदेश या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहे. प्रत्येक महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदांनी जाहीर/निश्चित केलेल्या जागांचा गोषवारा तयार करावा व त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी.

२. सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती यांनी त्यांच्या क्षेत्रामध्ये होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इत्यादी तात्पुरत्या जाहिराती लावण्यासाठी निश्चित केलेल्या जागांची माहिती आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना दोन आडवड्यांच्या आत सादर करावी व आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी सदर माहिती मा.उच्च न्यायालयास व शासनास एकत्रित सादर करावी.

३. सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा यांनी जाहिराती/ होर्डिंग्स इत्यादीबाबत दररोज दिल्या जाणाऱ्या परवानग्यांची माहिती Integrated Web Based Portal अथवा उपलब्ध असलेल्या सॉफ्टवेअरद्वारे दिलेल्या संबंधित पोलिसांना तात्काळ उपलब्ध करून द्यावी.

४. प्रत्येक जाहिरात बॅनर /होर्डिंग इत्यादींवर अर्जदाराचे नाव, परवानगी क्रमांक, परवानगी दिलेले ठिकाण, परवानगीचा कालावधी इ. माहिती असणारा QR कोड लावण्याची कार्यवाही सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा यांनी करावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१११४१४५१३५८६२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by C Priyanka
Date: 2022.11.14 14:53:08 +05'30'

**(प्रियांका कुलकर्णी-छापवाले)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सविच (नवि-२), नगर विका विभाग, मंत्रालय, मुंबई
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई
६. आयुक्त, सर्व महानगरपालिका,
७. मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका/नगरपरिषद
८. सहायक सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई
९. निवडनस्ती-नवि-२२.